# प्रकरण पाचवे

# बहिणाबाईंच्या कवितेतील शैली

## प्रकरण पाचवे

# बहिणाबाईंच्या कवितेतील शैली

### प्रस्तावना

कोणताही कलावंत जेव्हा कलानिर्मिती करतो तेव्हा त्यामागे त्याची एक ठाम भूमिका असते. ही भूमिका कवितेतून मंडण्याची विशिष्ट शैली असते. ही भूमिका ज्या पद्धतीने कवीच्या कवितेमधून प्रकट झालेली असते त्यावरून त्यांची काव्यविषयक शैली, त्यांच्या काव्याचे स्वरुप आपल्या लक्षात येते.

बहिणाबाई अशिक्षित होत्या. परंतु त्यांचे मराठी भाषेवरील प्रभुत्व असामान्य म्हटले पाहिजे. कारण आधुनिक कवीच्या काव्यात ज्याप्रमाणे यमके, प्रतिमांची मांडणी, अनुप्रास यांचे सौंदर्य आहे. त्याप्रमाणे बहिणाबाईंच्या प्रत्येक कवितेत प्रतिमांची मांडणी, अनुप्रास, यमके, सुलभता हे सर्व आहे.

### काव्यप्रयोजन

काव्यप्रयोजनाचे हेतू अनेक आहेत त्यातील एक हेतू प्रामुख्याने साहित्यातून वाचकांना आनंद प्राप्त करून देणे हा असतो. आपल्याकडील मम्मट, दंडी, जगन्नाथ पंडित, रुद्रट इ. नी काव्यप्रयोजनाचा हेतू आनंदप्राप्ती आहे हे सांगितले आहे.

परंतु बहिणाबाईंना काव्यप्रयोजन म्हणजे काय ? आणि कविता म्हणजे काय हे सुद्धा माहित नव्हते. आपली कविता कशी जन्मास आली हे सांगताना त्या नम्रपणे म्हणतात,

"माझी माय सरसोती

माले शिकवते बोली

लेक बहिनाच्या मनी

किती गुपीतं पेरली"[१]

बहिणाबाई आपल्या कवितेचे श्रेय स्वत: न घेता 'सरस्वती' ला देतात. सरस्वती ही विद्येची देवता. ती आपली माता असल्याचे सांगतात. तिची गुपितं माझ्या मनात आहेत आणि तिच्या कृपेनेचं मी बोलते असे त्या म्हणतात मराठीमध्ये स्त्रियांनी रचलेल्या काव्याची परंपरा अतिशय जुनी आहे. पूर्वीच्या काळी पहाटेच्यावेळी जात्यावर बसून स्त्रिया ओव्या गात असतं आणि त्या ओव्यांमधून आपल्या दूर गेलेल्या 'पतीचे' व इतर जवळच्या व्यक्तीचे स्मरण करीत. पूर्वी 'गिरण' हे यंत्र नव्हते. त्यामुळे सर्व धान्य घरीच दळावे लागत असे. हे दळण दळत असताना जे श्रम होत असत ते जाणवू नये म्हणूनही ओव्या गायल्या जात असाव्यात. बहिणाबाईंचे जीवन खेडेगावातचं गेले. साहजिकच त्यांनी ग्रामजीवन पूर्णपणे अनुभवले होते. अगदी दळण दळण्यापासून ते शेती करण्यापर्यंत सर्व कामे त्यांनी स्वत: केली होती.

बहिणाबाईंचं काव्य जन्माला आले ते आपल्या अनुभूतीशी प्रामाणिकपणा राखून ! त्यांनी स्वत:ला कविता करायची आहे म्हणून काव्य रचले नाही. तर जीवन जगत असताना त्यांनी दैनंदिन व्यवहारात ज्या गोष्टी पाहिल्या ऐकल्या आणि त्यातून त्यांना जे जाणवलं, गवसलं ते सगळ्यांना सांगत असताना त्याचे सहज काव्यरुप तयार झाले. बहिणाबाईंचे काव्य हे मुद्दामहून म्हणजे वृत्ते, अलंकार जुळवून केलेले काव्य नाही. कविता करायची आहे आणि त्यासाठी शब्द शोधायला हवेत असे त्यांच्या बाबतीत कधीच झाले नाही. रोजची कामे करीत

असताना त्यांना जे अनुभव आले, जे कष्ट करावे लागले, जो त्रास सहन करावा लागला त्याचे रुपांतर काव्यात झाले. या सगळ्या गोष्टीमधूनचं त्यांची कविता जन्मास आली.

पूर्वी जात्यावर दळण दळावे लागत असे. त्याला बहिणाबाई तरी कशा अपवाद असणार ? जात्यावर दळता दळताचं त्यांच्या ओठावर गाणे येत असे.

''अरे घरोटा घरोटा
माझे दुखता रे हात
तसं संसाराचं गानं
माझं बसते मी गात ''[२]

त्यांच्या कवितेमध्ये विचाराची संगती असल्याचं दिसून येते. त्यांनी कवितेमध्ये किती सुलभतेने तत्त्वज्ञान सांगितले आहे त्या प्रत्येक गोष्टीशी संवाद साधत असत. जात्यामधून पीठ येण्याची क्रिया होते तर त्याला 'जातं' का म्हणायचे असे त्या विचारतात. या ठिकाणी आपल्याला त्यांची निरीक्षणशक्ती दिसून येते. या आधीच्या कवितेत सांगितल्याप्रमाणे त्यांनी आपल्या कवितेचे श्रेय सरस्वती मातेला दिले आहे. त्याचबरोबर त्यांनी 'घरोट' या कवितेत सांगितले आहे.

''अरे घरोटा घरोटा
तुझ्यातून पडे पीठी
तसं तसं माझं गानं
पोटातून येतं व्होटी''[३]

ज्याप्रमाणे घरोट्यामध्ये धान्य घातल्यानंतर पीठ सहजपणे बाहेर येते त्याप्रमाणे त्यांची कविता सहजपणे स्फुरली आहे. प्रत्येक कवी आपले काव्याचे प्रयोजन काय ?

आपण काव्यनिर्मिती कशी केली आणि कशासाठी केली ? हे सर्वांना सांगत असतो. पण बहिणाबाईंनी आपले काव्य कसे निर्माण झाले हे किती साध्या आणि सोप्या शब्दात वर्णन केले आहे . जीवन जगत असताना अतिशय कठीण प्रसंग आले. त्यामधून त्या तावूनं सुलाखून निघाल्या. आचार्य अत्रेनी लिहिले आहे, 'अरे हे बावनकशी सोने आहे.' बावनकशी सोने होण्यासाठी आगीमधून तापून निघावे लागते. बहिणाबाई सुद्धा जीवनाच्या संघर्षामध्ये कठीण प्रसंगाला तोंड देवून यशस्वी झाल्या होत्या. थोडक्यात सांगायचे म्हणजे बहिणाबाईंचे काव्य हे अनुभवाचे सारं असलेले काव्य आहे.

त्यांना जीवनात जे अनुभव आले ते अनुभव त्यांनी कवितेच्या रुपाने मांडले. बहिणाईंनी आपल्या कवितेमधून वास्तवतेचे चित्रण केले आहे. दैनंदिन जीवनाची वाटचाल करताना पावलोपावली येणाऱ्या समस्यांशी झगडत संसारात आलेल्या सुख दु:खाशी सामना करीत जीवनातील प्रत्येक भलाबुरा क्षण अनुभवतं, त्यांची कविता निर्माण झाली. दैनंदिन व्यवहारातील शब्द, व्यवसायांशी निगडीत कविता इ. मुळे बहिणाबाईंची कविता ही आपलीच कविता आहे असेच वाटते.

**स्त्रियांची भाषा**

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्त्े तत्र देवता:' हे संस्कृत मधील सुभाषित नारीचे समाजजीवनातील स्थान किती महान होते हे सुचविते. परंतु असे असले तरी भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती आहे. त्यामुळे प्राचीन कालखंडापासून 'चूल आणि मूल' एवढेच तिचे कार्यक्षेत्र राहीले.

प्रत्येक स्त्री ही कविता करीत असते. आपल्या लहान बाळाला झोपवताना प्रत्येक आई अंगाई गीत गात असते. त्यावेळी तिच्या ओठावर ज्या ओळी येतात ती कवितेची सुरुवातच असते. स्त्री आणि कविता यांचे नाते फार पूर्वीपासूनचे आहे. स्त्रियांची कविता ही सहजपणे बाहेर पडणारी कविता आहे. स्त्रीया विविध कामे करत असताना झालेले श्रम विसरण्यासाठी व दु:खाचा विसर पडावा म्हणून ती सुरुवातीला गुणगुणतं असे. त्यामधूनच तिला कविता जवळची वाटू लागली. पूर्वी ज्या स्त्रिया चार भिंतीच्या बाहेर येऊ शकत नव्हत्या त्या स्त्रियां घराबाहेर येवू लागल्या. बाहेरचं जग समाज यामध्ये वावरायला शिकल्या.

स्त्रियांची भाषा ही मृदू असते. त्या कितीही कठोर असल्या तरी त्यांच्या भाषेत एक प्रकारचे मार्दव असते. बहिणाबाईंनी आपल्या कवितेत रोजच्या व्यवहारातील भाषा वापरली आहे. त्या भाषेमध्ये एक प्रकारचा गोडवा आहे. त्यांच्या कवितेतील शब्द सर्वसामान्य लोकांच्या जीवनांशी निगडित आहेत. स्त्रियांचे जे जिव्हाळ्याचे विषय आहेत ते विषय त्यांच्या कवितेचे असल्यामुळे स्त्रियांना त्यांची कविता जवळची वाटते.

प्रत्येक स्त्रीचे भावविश्व माहेर आणि सासर असते. त्यांच्या कवितेमधून माहेरबद्दलची ओढ आणि सासरबद्दलचे प्रेम दिसून येते. त्यांनी आपल्यां वडीलांच्या प्रतिष्ठेचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे.

> ''बापाजीच्या हायलीत
> येती शेट शेतकरी
> दारी खेटराची रास
> घरी भरली कचेरी''[४]

याठिकाणी आपल्याला स्त्रीची भाषा जाणवते. आपले वडील किती श्रीमंत आहेत आणि त्यांना समाजात किती मान, आदर आहे हे सांगण्यासाठी त्यांनी 'दारी खेटराची रास' अशी प्रतिमा वापरली आहे. ही कविता वाचत असताना एका कवयित्रीची कविता आहे असे जाणवते. बहिणाबाईंची भाषाशैली ही सर्वसामान्य स्त्रियांची जी भाषा असते तशीच आहे.

बहिणाबाईंची कविता ज्या काळात लिहिली गेली त्या काळात समाज अप्रगत होता. रुढी, परंपरा, अंधश्रद्धा यांनी समाज ग्रासलेला होता. त्यावेळी स्त्रियां म्हणजे एखादं गोठ्यातलं जनावरं अशीच स्त्रीची अवस्था होती.

त्यामुळेच बहिणाबाईंच्या कवितेमध्ये स्त्रियांचे शब्द, स्त्रियांच्या कामाशी निगडीत अशी शब्दरचना आलेली आहे. सर्वसामान्य स्त्रीला काम करताना जो त्रास होतो किंवा जे दु:ख तिच्या वाट्याला येते ते बहिणाबाईंनी आपल्या भाषेत रेखाटले आहे. त्या दळण दळत असताना म्हणतात अरे घरोट्या माझा हात दुखतो. घरातील सगळी कामे केल्यानंतर दुसऱ्या दिवशी पहाटे उठून दळण दळायचे म्हणजे मला खूप त्रास होतो, म्हणूनच तुझा खुंटा ओढताना माझे हात भरून येतात. हे कष्ट कमी जाणवावे म्हणून मी 'संसाराचे' गाणे गाते.

त्यांची कविता ही एका स्त्रीची असल्यामुळे त्यांच्या कवितेमधील रुपके नेहमीच्या, दैनंदिन जीवनातील आहेत. जसे तवा चुलीवर, आधी हाताला चटके, मग मिळते भाकर. 'घरोटा' या कवितेमधील 'जात' इ. उल्लेख आढळून येतो. जीवनातील एखादे तत्त्वज्ञान सांगत असतानादेखील त्यांनी स्त्रियांशी संबंधित भाषेमधील प्रतिमांचा वापर केलेला आढळतो.

बहिणाबाईंनी आपल्या कवितेमध्ये रुढी, परंपरा यांचे चित्रण केले आहे. 'सण' हा स्त्रियांच्या जिव्हाळ्याचा विषय असतो. शिणलेल्या जीवाला या निमित्ताने चार

दिवस विरंगुळा मिळतो. स्त्रियांच्या विश्रांतीचे, हौस-मौज करण्याचे हेच दिवस असतात. त्यामुळेच स्त्रियांना सण महत्त्वाचे वाटतात. या सणांचे वर्णन करताना बहिणाबाईंचेही मन सुखावून जाते.

'आखजी' म्हणजे अक्षयतृत्तीया. या सणाचे वर्णन करताना त्या म्हणतात, 'हा सण मुलींच्या, स्त्रियांच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा आहे. त्या निमित्ताने माहेरवाशिणी घरी येतात. सर्वांशी गाठीभेटी होतात. सणानिमित्त पारंपरिक खेळ खेळले जातात.' या ठिकाणी बहिणाबाईंनी, स्त्रियांच्या भावनिक विषयातून एका रुढीचे चित्रण केले आहे. त्यांच्या कवितेतील स्त्रीची भाषा ही जीवनातील खऱ्या अनुभवांवर आधारलेली आहे. स्त्रीच्या व्यक्तित्त्वाचा, वेगळेपणाचा ठसा स्त्रियांच्या भाषेतून या कवितेमध्ये उमटला आहे.

साहित्यामध्ये पुरुषांची भाषा वेगळी आणि स्त्रियांची भाषा वेगळी असे आपण म्हणत नाही. कारण स्त्री आणि पुरुष यांची भाषा एकच असते. ''दोहोंचे बाह्यस्वरुप एकच असले तरी आंतमध्ये सूक्ष्म व पुरुषांच्या भाषेपासून अलग करण्याइतके स्पष्ट असे फरक स्त्रियांच्या भाषेत आहेत.''[५] बहिणाबाईंची कविता स्त्रीभाषेचे असे वेगळे स्वरुप स्पष्ट करते. बहिणाबाईंच्या कवितेमधील स्त्रियांचे उच्चार दीर्घ आहेत. त्याचप्रमाणे मृदू व्यंजनाचेही उच्चार आढळतात. बहिणाबाईंचे विश्वच शेती आणि घर हे असल्यामुळे त्यासंबंधीचे शब्दही काव्यात आढळतात.

## बहिणाबाईंच्या काव्यातील बोलीभाषा

बहिणाबाईंचा काव्यपरिसर हा जळगाव-धुळे जिल्हा आहे. या परिसरातील बोली ही अहिराणी आणि खानदेशी-वऱ्हाडी अशी आहे. खानदेश प्रांतामध्ये बोलल्या जाणाऱ्या बोलीला 'अहिराणी' असे म्हणतात. खानदेश प्रांतावरून तिला 'खानदेशी' असे देखील

बोलले जाते. जळगांवच्या काही भागामध्ये वऱ्हाडी भाषा देखील बोलली जाते. शेवटी अहिराणी आणि खानदेशी वऱ्हाडी या मराठीच्यांच बोली आहेत.

बहिणाबाईंनी आपल्या बोली भाषेतच अत्यंत कौशल्याने, सोपे सोपे आणि सुंदर सुंदर शब्द वापरले आहेत. त्यांच्या अहिराणी आणि खानदेशी वऱ्हाडी भाषेमुळे तर काव्याची लज्जत आणखी वाढली आहे.

**उच्चारप्रक्रिया**

अहिराणी भाषेत 'ळ' चा उच्चार 'य' असा केला जातो. 'आली आली डोयापुढे माझ्या माहेराची वाट'. या ठिकाणी डोळ्यापुढे च्या ऐवजी 'डोयापुढे' असा उल्लेख केला आहे. बहिणाबाईंची कविता वाचत असताना त्यातील बोली भाषेमुळे ती कविता आपल्या अंतर्मनाला स्पर्श करून जाते. बहिणाबाई आपल्या माहेरच्या नदीचे वर्णन करत असताना, या नदीच्या पाण्याला अमृताची गोडी आहे हे सांगताना त्या आपल्या बोली भाषेत सांगतात, 'पानी लौकीचं नित्तय । त्याले अम्रीताची गोडी'. धुळे जळगाव परिसराच्या, ग्रामीण भागामध्ये अहिराणी भाषा बोलली जाते. ''स्वाभाविक भाषेमुळे ह्या काव्याचं वेगळेपण अगदी सहज नजरेत भरण्यासारखं आहे. 'रंग भरले डोयात', 'रंग भरले आभायात', 'तव्हा तोंडातली चव', 'तुले कशाचं माहेर', 'लागे कुलूप दाराले', 'त्याले म्हनवा घरोट', 'अरे पानी पेयाआधी खाई घे लोडगा' यासारख्या ओळी आपण जेव्हा वाचतो तेव्हा त्या भाषेची विशिष्ट लय नि लकब लक्ष वेधून घेते. ह्या नेहमीच्या बोली भाषेत त्या-त्या भावना व्यक्त करण्याचं कसब असल्याची जाणीव होते.''[६]

"आरे फूकनी फूकता,

इस्तो वाजे तडतड

तव्हा धगला धगला

चुल्हा कसा धडधड

मंग ठाकला उसासा

थोडा घेतला इसावा

एकदाचा आदयला

झट चुल्ह्यावर तावा"[७]

बहिणाबाईंच्या बोलीमुळे त्यांच्या काव्यातील वेगळेपण आपल्या लक्षात येते. त्यांची कविता ग्रामीण भागांशी संबंधित असल्यामुळे त्यांच्या काव्यात, चुल्हा, लहाडी असे शब्द येतात. त्याचप्रमाणे बोलीभाषेतील फुकनी, तावा, धुक्कय यासारखे अनेक शब्द प्रमाण आढळतात. काही ठिकाणी मात्र प्रमाण बोलीतील शब्द आलेले दिसतात. उदा. 'माझी माय सरसोती', 'माझ्यासाठी पांडुरंगा तुझं गीता भागवत' यासारखे शब्द त्यांच्या काव्यात आढळतात. एकंदरीत बहिणाबाईंच्या काव्यातील अहिराणी आणि खानदेशी वऱ्हाडी भाषेमुळे, कवितेला एक आगळी-वेगळी न्यारीचं लज्जत प्राप्त झाली आहे.

बहिणाबाई निरक्षर होत्या. स्वाभाविकचं जी बोली भाषा होती त्यामधूनच त्यांनी आपली कविता साकार केली. आज बोलीभाषेतील साहित्याला वेगळं स्थान प्राप्त झालं आहे. आज मुद्दामहून बोलीभाषेत साहित्य निर्माण केले जाते. त्यांची कविता ही अनुभवातून जन्मलेली कविता आहे. त्यामुळेच ती जीवनाभिमुख कविता आहे.

## उपरोधात्मक शैली

बहिणाबाईंच्या काव्यशैलीचा आणखी एक विशेष म्हणजे उपरोधात्मक शैली होय. त्यांनी समाजामध्ये चाललेल्या व्यवस्थेवर आपल्या कवितेमधून एक दृष्टिक्षेप टाकला आहे.

'अनागोंदी कारभार' ही कविता अशीच उपरोधात्मक आहे. या कवितेत गावच्या कारभारातील दोष दाखविले आहेत. पूर्वी खेडेगावामध्ये बलुतेदारी पद्धत होती. म्हणजे लोहार, चांभार, न्हावी, बेलदार, पाथरवट, पिंजारीन इ. हे बारा बलुतेदार त्यांन ठरवून दिलेल्या कामामध्ये कुशल असतं. पिढ्यानपिढ्या हा कारभार चालत असे. परंतु हळूहळू समाजामध्ये परिवर्तन घडू लागले आणि याचा परिणाम गावच्या कारभारावर पडू लागला. या कवितेमधून त्यांनी सामाजिक स्थितीमध्ये अचानक बदल झाला तर संपूर्ण व्यवस्था विस्कळीत होते हेच सांगितले आहे. त्यातून त्यांचा पारंपरिक दृष्टीकोन व्यक्त होतो. परंतु आज हा दृष्टीकोन कोणाला मान्य होईल असे नाही.

अशाचप्रकारे त्यांची 'नही दियामधी तेल' ही दुसरी कविता आहे. या कवितेत समाजातील विषमतेवर त्यांनी प्रकाश टाकला आहे. या ठिकाणी समाजातील भयानक गरिबी त्यांनी आपल्यासमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. सर्वांची सुख-दुःखे आपलीच आहेत असे मानून त्यांनी आपल्या 'नही दियामधी तेल ' या कवितेत गरिबांच्या संसाराची अवस्था सांगितली आहे.

> ''नही दियामधी तेल
> कशी आंधारली रात
> तेल मिये एकदाच
> नेली उंदरानं वात''[८]

अंधारी रात्र आहे. त्यामुळे दिवा लावायचा म्हटलं तर दिव्यात तेल नाही, वात नाही. कोठूनतरी तेल आणि वात मिळवली पण काडीपेटी सापडेना. शेवटी काडीपेटी सापडते पण तिच्यामध्ये एकच काडी असते. या ठिकाणी त्यांनी सामान्य माणसांच्या जीवनाचे चित्रण केले आहे. साधा दिवा लावायचा म्हटलं तरी किती अडचणी तर इतर काही गोष्टी मिळवण्यासाठी सामान्य माणसांना किती धडपड करावी लागतं असणार. समाजातील गरिबीवर बहिणाबाईंनी उपरोधात्मक टीका केली आहे.

बहिणाबाईंनी जीवनातीलं कारुण्य सर्वसामान्यांना पडणारे प्रश्न आपल्यासमोर मांडले आहेत. त्यातून त्यांची उपरोधात्मक शैलीच येथे दिसून येते. त्यांची कल्पनाशक्ती विलक्षणीय होती. त्यामुळेच त्यांनी 'अनागोंदी कारभार', 'नही दियामधी तेल', 'रायरंग', 'वाटच्या वाटसरा' यासारख्या कविता लिहिल्या आहेत. समाजाला जागृत करण्यासाठी माणसांना शहाणपण शिकवण्यासाठी त्यांनी कविता रचल्या. त्यांच्या कवितांमधून मानवी जीवनाला बहुमूल्य संदेश मिळतात.

**शब्दांची जाण**

त्यांनी आपल्या कवितेमध्ये जे शब्द, यमक यांचा वापर केला आहे त्यामधून भावगडद अर्थ स्पष्ट होतात. यावरून त्यांना शब्दांबद्दल असणारी जाण किती सूक्ष्म आहे हे आपल्या लक्षात येते.

> ''माझ्या माहेराच्या वाटे
> जरी आले पायी फोड
> पाय चालले चालले
> अशी माहेराची ओढ ''[१]

या ओळीतून त्यांना माहेरविषयी असलेली ओढ जाणवते. त्या म्हणतात, 'माहेरची वाट मखमली आहे, त्याठिकाणच्या वाटेवरच्या दगडाला जरी ठेच लागली तर तो दगड बोलू लागतो.' यातून त्यांनी माहेरबद्दलचे प्रेम शब्दातून व्यक्त केले आहे.

त्यांची शब्द वापरण्याची तऱ्हाचं निराळी होती. शेतकऱ्याचे जीवन म्हणजे कष्टाचे. त्याने कितीही कष्ट केले तरी त्याला दारिद्र्यातून मुक्तता नसे. त्या शेतकऱ्याला कर्जबाजारीपणामुळे विठ्ठलाची भक्ती करणेसुद्धा शक्य नव्हते हा अनुभव बहिणाबाईंना होता. म्हणूनच त्या म्हणतात, 'तुझ्या रुपापुढे येतं, आड सावकराचं सोंग' अशा शब्दप्रयोगामधून शेतकऱ्यांच्या जीवनात असणारे दारिद्र्य त्यांना असणाऱ्या अनेक अडचणी आपल्या लक्षात येतात.

बहिणाबाईंनी आजूबाजूच्या निसर्गालाही आपल्या शब्दांमधून काव्यरुप दिले आहे. त्यामधूनही त्या तत्त्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न करतात.

> ''ऊन वाऱ्याशी खेयता
> एका एका कोंबातून
> पर्गटले दोन पानं ''[१०]

या ओळीतून बहिणाबाईंनी निसर्गातील चमत्काराचे वर्णन आपल्या शब्दातून केले आहे. 'ऊन वाऱ्याशी खेयता' या शब्दांतून अप्रत्यक्षपणे रोपांना प्रकाश आणि वाऱ्याची आवश्यकता असते. असे त्यांनी सांगितले आहे. मानवाच्या जीवन आणि मरणांमधील अंतर किती हे सांगण्यासाठी त्यांनी 'एकच श्वास' हा शब्द वापरला आहे. पण त्या एकाच शब्दामधून किती गहन अर्थ स्पष्ट झाला आहे. त्यांनी कापणी, मळणी, उपनणी, देव अजब

गारोडी या कवितांमधून शेतकरी जीवनाचे चित्र शब्दबद्ध केले आहे. बहिणाबाईंची कविता त्यांच्या शब्द रचनेमुळे मनावर एक वेगळाच ठसा उमटवून जाते.

**काव्यातील म्हणी**

बहिणाबाईंनी आपल्या कवितेत म्हणींचा वापर केला आहे. ''म्हणी म्हणजे काय ? तर मार्मिक बोलणं ! मोजक्या शब्दात फार मोठा आशय व्यक्त करणं. अगदी सोप्या शब्दात वस्तुस्थितीचा परिचय करून देणं. विसगंतीवर नेमकं बोट ठेवणं. मानवी जीवनातील, आचार-विचारांतील, स्वभावातील, कार्यपद्धतीतील सूक्ष्म अवलोकनातून म्हणींचा जन्म झाला असावा.''[११]

बहिणाबाईंनी आपल्या कवितेतून जीवनातील अनुभवांचे दर्शन घडविले आहे. सहज बोलता, बोलता प्रसंगानुसार सुचलेल्या या म्हणी आहेत. जीवनात अनुभवांना फार मोठे स्थान आहे. त्यांनीही आपल्याला आलेल्या अनुभवाचे कथन केले आहे.

''दया नही, मया नही डोयाले पानी
गोगलगायच्या दुधाचं काढा वो लोनी''[१२]

बहिणाबाईंनी या कवितेत अत्यंत मार्मिकतेने वरील म्हणींचा वापर केला आहे. काही लोकांना वरून खोटे-खोटे बोलण्याची, किंवा एखाद्याबद्दल खोटी भावना व्यक्त करण्याची सवय असते. जिव्हाळा, प्रेम नसते आणि तरीही डोळ्यात पाणी असते. म्हणजे गोगलगायीच्या दुधाचे लोणी काढण्याचाचं हा प्रकार आहे. एखाद्याला कोणतीही गोष्ट जवळ असताना त्याचे महत्व त्याला पटत नाही. पण ती गोष्ट जवळ नसताना किंवा हवी असताना त्याचे महत्व आपल्याला पटते म्हणूनच बहिणाबाई म्हणतात,

“रस्त्यात पडला सोन्याचा वाया
तिकडून आला भगा आभाया ”[१३]

म्हणजे रस्त्यात आपल्या समोर सोने असते. पण आपण आभाळाकडे बघत असतो. पण नंतर आपल्याला हुरहुर लागते की, आपल्याकडे ती वस्तू नाही. त्यांना या ठिकाणी असे सुचवायचे आहे की तुमची दृष्टी डोळस असायला पाहिजे.

एखाद्या माणसाला वाटते की, आपल्याला सगळ्यांनी मोठे म्हणावे. पण जे वास्तव आहे तेचं खरे अस्तित्व. हे माणसांने समजून घ्यायला हवे. त्या म्हणतात, “गांडुळाला राग आला म्हणून फणा काढून स्वत:ला त्याने नाग समजावे त्याचप्रमाणे काही माणसांना आपण कर्तृत्वहीन असतानाही इतरांनी आपणास मोठे म्हणावे अशी अपेक्षा असते.” बहिणाबाईंची निरीक्षण शक्ती खूप मोठी आहे. जे खोट्या भक्तीचा डांगोरा पिटतात त्यांना त्या सांगतात, तुमच्या खोट्या भक्तीने तुम्हाला भगवंत भेटणार नाही. मनामध्ये परमेश्वराविषयी प्रेम, भक्ती असेल तरच तुम्हाला परमेश्वर भेटेल.

“आग्या टाकीसनी चुल्हा पेटत नही
टाया पिटीसनी देव भेटत नही”[१४]

आग्या (काजवा) टाकल्यानंतर ज्याप्रमाणे चूल पेटत नाही त्याचप्रमाणे फक्त टाळ्या वाजवल्यानंतर देवाचे दर्शन होणार नाही. तर मनामध्ये परमेश्वराविषयी खरी भक्ती पाहिजे.

बहिणाबाईंच्या प्रत्येक म्हणीमध्ये अनुभवांचे सार दिसून येते. रोजचे जीवन जगत असताना आलेल्या अनुभवांवरून त्यांच्या म्हणी व्यक्त झाल्या आहेत. बहिणाबाई या शिकलेल्या नव्हत्या तरीही असे उल्लेख, वर्णने अत्यंत मार्मिकतेने केली आहेत.

''मस्तकातलं पुस्तकात गेलं

पुस्तकातलं मस्तकात आलं ''[१५]

म्हणजे माणसाच्या डोक्यात जे विचार असतात, जे ज्ञान असते, त्या आधारेच माणूस लिहितो आणि ते दुसऱ्याने वाचल्यानंतर त्यामधील ज्ञान त्यांच्या डोक्यात जाते. या ठिकाणी एकाची लिहिण्याची क्रिया दर्शविली आहे तर दुसऱ्याची आकलन करण्याची. बहिणाबाईंनी म्हणींमधून सर्वसामान्य लोकांना अत्यंत मौलिक संदेश दिले आहेत.

**समारोप**

बहिणाबाईंची कविता ही शैलीपेक्षा अनुभवाच्या आधारावर सजलेली कविता आहे. त्यांच्या कवितामधून जीवनात घडणाऱ्या घटना व त्यातून येणारे अनुभव यांचे प्रकटीकरण केलेले आहे. भोवतालच्या परिस्थितीचे भान राखून आपली अनुभूती बहिणाबाईंनी आपल्या काव्यात चित्रित केली आहे.

बहिणाबाईंच्या कवितेमधून सर्वप्रथम बोलीभाषेचा वापर झालेला दिसून येतो. बहिणाबाई या अशिक्षित होत्या. त्यामुळे त्यांनी कवितेमध्ये बोलीभाषेचांच वापर करणे अपेक्षित आहे. त्यांची भाषा अहिराणी, खानदेशी-वऱ्हाडी आहे. 'ळ'च्या ऐवजी 'य', 'ण'च्या ऐवजी 'न' असे शब्द त्याचप्रमाणे तुले, मले, जोडीसन, वाहीसन, करीसन या ग्रामीण शब्दांनी कवितेमध्ये एक प्रकारचा गोडवा निर्माण झाला आहे. त्यांच्या कवितेमधून एका स्त्रीची भाषा व संसार, शेती, प्रपंच इ. वर्णन कवितेमध्ये मोठ्या प्रमाणावर आढळते. बहिणाबाईंची कविता ही श्रमातून साकारलेली आहे. त्यांची गाणी ही श्रमिकांची वेदना आहेत. त्यांची कविता ही संसारातून मिळणारे कडू गोड अनुभव, जीवनातील प्रगल्भता, सुखदु:खाची जाणीव यातून आकाराला आली आहे.

त्यांची कविता विलक्षण प्रतिमासृष्टी, निसर्गविषयक सौंदर्य, अनुप्रास इ. यांनी नटलेली आहे. बहिणाबाई या अशिक्षित होत्या. परंतु त्यांची कवितेची शैली ही केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवी इ. कवींच्या काळातील शैलीसारखी आहे. त्यांच्या कवितेमध्ये एक सहजता, सुंदरपणा आहे.

-----------

# प्रकरण पाचवे

## संदर्भ


१. चौधरी बहिणाबाई, बहिणाबाईंची गाणी, ज्योति पिरिऑडिकल्स, आवृत्ती चौथी, १९८२, पृष्ठ क्र.३.

२. तत्रैव, पृष्ठ क्र.१९.

३. तत्रैव, पृष्ठ क्र.१९.

४. तत्रैव, पृष्ठ क्र.५.

५. स.ग. यादव, निसर्गकन्या बहिणाबाई, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, पहिली आवृत्ती, १९८२, पृष्ठ क्र.१०९.

६. प्रमिला भिरूड, बहिणाईची गाणी एक अभ्यास, व्यंकटेश प्रकाशन, प्रथमावृत्ती, ऑगस्ट, २०००, पृष्ठ क्र.२३४.

७. चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी, ज्योति पिरिऑडिकल्स, आवृत्ती चौथी, १९८२, पृष्ठ क्र.९६.

८. तत्रैव, पृष्ठ क्र.७५.

९. तत्रैव, पृष्ठ क्र.९.

१०. तत्रैव, पृष्ठ क्र. ३४.

११. प्रमिला भिरुड, बहिणाअीची गाणी – एक अभ्यास, व्यंकटेश प्रकाशन, प्रथमावृत्ती, ऑगस्ट, २०००, पृष्ठ क्र.२१४.

१२. चौधरी बहिणाबाई, बहिणाईची गाणी, ज्योति पिरिऑडिकल्स, आवृत्ती चौथी, १९८२, पृष्ठ क्र. १२५.

१३. तत्रैव, पृष्ठ क्र.१२५.

१४. तत्रैव, पृष्ठ क्र.१२६.

१५. तत्रैव, पृष्ठ क्र.१२७.


--------